# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६३१/२०१७/२४

**(नोदंणी क्रमांक २०१७०५००५७)**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- ११.०५.२०१७ |
| निकाल | दिनांक :- २७.०६.२०१७ |

श्री. यासीन खान अहमद खान — तक्रारदार
PHG/PC ४/३२,
भडकलगेट,
औरंगाबाद ४३१००१.
(ग्राहक क्रमांक ४९००१०१७४४९७)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. यासीन खान अहमद खान, PHG/PC ४/३२, भडकलगेट, औरंगाबाद यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ११.०५.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.**

अर्जदार हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०१७४४९७ असा आहे. ग्राहकाने फेब्रुवारी २०१७ या महिन्याचे रुपये १६८०/- महावितरणला पावती क्रमांक ५५८१९४६ दिनांक २८.०२.२०१७ रोजी भरले आहेत. सदर ग्राहकास मार्च २०१७ मध्ये रुपये ८११५५/- थकबाकी म्हणुन चुकीने दाखविण्यात आले. सदर बील भरण्यासाठी ग्राहकास दिनांक १८.०४.२०१७ रोजी नोटीस क्रमांक ५४२ अन्वये सदर थकबाकी भरण्यास सांगितले. सदर नोटीस बेकायदेशीर असून विद्युत पूरवठा खंडीत करण्यात येईल अशी धमकी देण्यात आलेली आहे.

वरील कारणास्तव अर्जदाराने मंचास खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

१) महावितरणने अर्जदाराचा विद्युत पूरवठा खंडीत करु नये.

२) महावितरणने चुकीने दिलेले देयक रुपये ८११५५/- मागे घेण्यात यावे.

३) अर्जदार मार्च महिन्याचे रुपये ४५७/- चे विद्युत देयक भरण्यास तयार आहे.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, वाळुज उपविभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक २२.०५.२०१७ नुसार असे सादर केले आहे की, सदर प्रकरण हे वीज चोरीचे आहे. अतिरिक्त कार्यकारी अभियंता, फिरते पथक, औरंगाबाद शहर यांनी सदरील ग्राहकाची दिनांक ३०.०३.२०१७ रोजी तपासणी केली असता त्यामध्ये घटनास्थळी Accucheck मीटर द्वारे केलेल्या तपासणीमध्ये

सदर ग्राहकाचे मीटर ६२.२ टक्के मंद गतीने चालत असल्याचे आढळुन आले. तसेच मीटरमध्ये फेरफार करुन एक अतिरिक्त रजिस्टर टाकल्याचे व Citycircuit short केल्याचे आढळुन आले. त्यामुळे अतिरिक्त कार्यकारी अभियंता, फिरते पथक, औरंगाबाद शहर यांचे अहवालानुसार ग्राहकास भारतीय विद्युत कायदा २००३, कलम १३५ अंतर्गत रुपये ९२००५/- चे वीज चोरी निर्धारण बील देण्यात आले.

सदर प्रकरणी अतिरिक्त कार्यकारी अभिंयता श्री. अजय सुधाकर भंगाळे, फिरते पथक, औरंगाबाद शहर यांनी दिनांक ३१.०३.२०१७ रोजी वीज वितरण कंपनीच्या जालना येथील पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केलेली असून गुन्हे क्रमांक CR ६२१/३१.०२.२०१७ अन्वये वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम १२६, १३५ ते १३९ मध्ये तरतुद केलेले अपराध व दंड ते ग्राहक गाऱ्हाणे मंचाच्या अधिकार कक्षेतून वगळण्यात आलेले आहे. सदर प्रकरण हे मंचाने दाखल करुन घेऊ नये व सदर तक्रार अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती मंचास केलेली आहे.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

१) अर्जदार श्री. यासीन खान अहमद खान यांनी सादर केलेले प्रकरण हे भारतीय विद्युत कायदा २००३, कलम १३५ मध्ये तरतुद केलेला अपराध आहे. सदर अपराध ग्राहक ग्राऱ्हाणे मंचाच्या कक्षेत येत नाही.

२) अतिरिक्त कार्यकारी अभिंयता श्री. अजय सुधाकर भंगाळे, फिरते पथक, औरंगाबाद शहर यांनी दिनांक ३१.०३.२०१७ रोजी वीज वितरण कंपनीच्या जालना येथील पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केलेली आहे. ग्राहकावर गुन्हे क्रमांक CR ६२१/३१.०२.२०१७ अन्वये वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात अलोला आहे.

३) वरील पैकी (१) नुसार सदर प्रकरण ग्राहक गाऱ्हाणे मंचाच्या अधिकार कक्षेत येत नसल्याने खारीज करणे उचित ठरेल.

वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सूनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, त्याचप्रमाणे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराचा अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२) महावितरणच्या नियमानुसार वीज बिलाची वसुली करण्यात यावी.

३) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | लक्ष्मण मु. काकडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |